**वाचले :-**

१. मा.आयुक्त सो यांचा दिनांक०९/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/३९३/२०२४
दिनांक ०९/०७/२०२४

**विषय :- गट 'अ' संवर्गातील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम – ४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग-१ ची पदे पदोन्नतीने भरताना, त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट-अ संवर्गातील बहुतांश पदे पदोन्नतीने भरणेकामी रिक्त होती. प्रत्यक्ष आस्थापनेवर असलेली पदे व संख्या विचारात घेता कार्यरत असलेल्या अधिकारी यांची संख्या अपुरी असल्याने उपलब्ध अधिका-यांवर कामाजाचा ताण येत होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रादेशिक कार्यक्षेत्राचा विस्तार व वाढलेल्या प्रशासकीय कामकाजाचा व्याप विचारात घेता महापालिकेतील विविध विभागांचे तसेच क्षेत्रीय कार्यालयांचे अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन तसेच नागरिकांची आणि प्रशासकीय कामे जलदगतीने होणे आवश्यक असल्याने व अपवादात्मक परिस्थीतीमुळे महानगरपालिका आस्थापनेवरील गट 'अ' संवर्गातील पदे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ मधील तरतुदीनुसार मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ सदरहू अट शिथील करण्यात येवून 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अंतर्गत नमूद सांविधानिक पदांव्यतिरिक्त उर्वरीत गट –अ मधील पदे पदोन्नतीने भरताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सभेच्या मान्यतेने भरण्यात यावीत' याप्रमाणे शासन मंजूर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मध्ये दुरुस्ती करण्याबाबत तसेच गट 'अ' संवर्गामध्ये देण्यात आलेल्या पदोन्नतीस शासनाची कार्योत्तर मंजूरी मिळण्याकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून अद्याप शासन मान्यता प्राप्त झालेली नाही.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट 'अ' संवर्गामध्ये देण्यात आलेल्या सर्व पदोन्नत्या शासनाच्या कार्यात्तर मंजूरीच्या अधिन राहतील. याची सर्व सबंधित अधिका-यांनी नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी
प्रत- सर्व संबंधित विभाग

D:\DATA\D Drive\Admin\Class 1-2\नस्ती\promotion 2021\order class 2.docx